# नांदेडात मोबाईल चोरणाऱ्या झारखंडच्या टोळीचा पर्दाफाश

## झारखंडकडे जाण्याच्या तयारीत असलेले ५ जण ताब्यात ; १६ मोबाईल जप्त



देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ▪ शहर व जिल्ह्यात मोबाईल चोरट्यांचा सुळसुळाट झालेला असतांनाच आता झारखंड राज्यातील मोबाईल चोरणारी टोळी नांदेडात दाखल झाल्याचे पोलिसांनी केलेल्या कारवाईवरुन दिसून येत असून झारखंडकडे जाण्याच्या तयारीत असलेल्या टोळीचा पर्दाफाश करुन ५ जणांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून ४ लाख २ हजार ५०० रुपये किंमतीचे १६ मोबाईल जप्त करण्यात भाग्यनगर ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाला यश आले.

शहरातील आठवडी बाजारातून नागरिकांचे मोबाईल लंपास करण्याच्या घटनेत वाढ झाली आहे. यामध्ये पोलिसांना चोरट्याचा शोध लावण्यात अपयश येत असतांनाच स्थापन केलेल्या पोलिस पथकाला झारखंड राज्यातून ५ चोरटे शहरात आल्याची गुप्त माहिती मिळाली असून ते नागपूरकडे खासगी वाहनाने जात असल्याचे समजले. या माहितीवरुन उपविभागीय पोलिस अधिकारी चंद्रसेन देशमुख यांना पोलिस अधिक्षक प्रमोदकुमार शेवाळे, अप्पर पोलिस अधिक्षक निलेश मोरे, विजय कबाडे यांनी दिलेल्या आदेशावरुन पोलिस निरीक्षक सुधाकर आडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे प्रमुख सपोनि सुशांत किनगे व कर्मचाऱ्यांनी हिंगोली गेट परिसरातील धाव घेतली. यावेळी झारखंड राज्यातील ५ जण खुराणा ट्रॅव्हलर्सच्या कार्यालयासमोर संशयीतरित्या थांबल्याचे दिसून आले. यावेळी पोलिसांनी शेख शोयब शेख उमर, शेख दिलबर शेख नसीरोद्दीन, शेख जियाद शेख मुजाहिद व इतर दोन विधीसंघर्ष बालकाची चौकशी करत झारखंड राज्यातून नांदेडात येण्याचे कारण विचारले असता ते उडवाउडवीचे उत्तरे देत होते. त्यामुळे पोलिसांनी त्यांची अंगझडती घेवून बॅगांची पाहणी केली असता त्यामध्ये ४ लाख २ हजार ५०० रुपये किंमतीचे १६ मोबाईल आढळून आले. ते पोलिसांनी जप्त करुन ५ जणांना ताब्यात घेतले.

### नांदेड व परभणीच्या आठवडी बाजारातून मोबाईल चोरल्याची कबुली

झारखंड राज्यातील पाच जणांना पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर त्या चोरट्यांनी परभणी येथील भाजीपाला विक्री मंडई व नांदेडातील तरोडा नाका भागात भरणाऱ्या बुधवारच्या आठवडी बाजारात फिरुन व्यक्तीच्या खिशातील चोरल्याची कबुली चोरट्यांनी यावेळी पोलिसांना दिली. त्यामुळे झारखंडची मोबाईल चोरणारी टोळी नांदेडात कार्यरत असल्याचे कारवाईवरुन दिसून येत आहे.

# मोबाईल चोरणाऱ्या टोळीला अटक

## तिघांना पोलिस कोठडी तर दोघांची बाल सुधारगृहात रवानगी

**नांदेड, ता.१५ (बातमीदार)** : शहरामध्ये आठवडी बाजारातून महागड्या मोबाईलची चोरी करणाऱ्या झारखंड येथील टोळीला भाग्यनगर ठाण्यातील गुन्हे शोध पथकाने शुक्रवारी (ता.१४) रात्री हिंगोली गेट येथून पकडले आहे. त्यांच्याकडून चार लाख दोन हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

शेख शोएब शेख उमर (वय २०), शेख दिलवर शेख नसीरोद्दीन (वय १९), शेख जियाद शेख मुजाहिद (वय २६, सर्व राहणार रा. महाराजपुर, जि.साहेबगंज) अशी आरोपींची नावे असून दोन विधीसंघर्षित बालकांचा समावेश आहे. यापैकी तिन आरोपींना पोलिस कोठीडीची शिक्षा देण्यात आली असून दोन विधीसंघर्षित बालकांना बाल सुधारगृहात दाखल



**नांदेड : शुक्रवारी रात्री आठवडी बाजारातून महागडे मोबाईल चोरणारी झारखंड राज्यातील टोळी भाग्यनगर ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने पकडली असून, तिघांना पोलिस कोठडीची शिक्षा देण्यात आली.**

हद्दीतील आठवडी बाजारामध्ये महागड्या मोबाईल चोरीचे प्रकार वाढल्याने पोलिस हतबल झाले होते. भाग्यनगर ठाण्याचे पोलिस निरीक्षक

गुन्हे शोध पथकाचे सहायक पोलिस निरीक्षक सुशांत गणपत किनगे व पोलिस कॉन्स्टेबल संजय कळके, प्रदीप गर्दनमारे, हनवता कदम, सुमेध ... असे पथक तयार केले. साध्या

कपड्यामध्ये शुक्रवारी पेट्रोलिंग करत असताना आठवडी बाजारात मोबाईल चोरणारी झारखंड राज्यातील टोळी हिंगोली गेट येथे असून ट्रॅव्हलसने नागपूरला जाण्याच्या तयारीत असल्याची गुप्त माहिती पथकाला मिळाली.

त्यानुसार सदर पथक हिंगोली गेट येथे गेले असता खुराणा ट्रॅव्हल्स समोर पाच व्यक्ती संशयीतरित्या उभे असल्याचे दिसले. त्यांना ताब्यात घेऊन विचारपुस केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. त्यांनी १२ जानेवारी रोजी परभणी येथील भाजीपाला बजार व तरोड्यातील बुधवारच्या बाजारातून मोबाईल चोरल्याचे सांगितले. पंचासमक्ष त्यांच्याकडून विविध कंपनीचे चार लाख दोन हजार ५०० रुपये किंमतीचे १६ मोबाईल जप्त करण्यात आले.